<u>**नियमित दिवाणी दावा क्र. २२३/१९७५ मध्ये निशाणी क्र. ३२७ कडील अर्जावर आदेश**</u>

१) प्रतिवादी क्र. २ब(ब) वैशाली यशवंत कुंभार, प्रतिवादी क्र. २ब(क) पद्मिनी यशवंत कुंभार व प्रतिवादी क्र. २ब(ई) रेखा यशवंत कुंभार यांचे दावा समन्स वादपत्राच्या टायटल क्लॉजमध्ये नमूद केलेल्या पत्त्यावरील घरावर डकवून सदर प्रतिवादींवर दाव्याच्या समन्सची बजावणी करण्याकरीता वादींनी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

२) अर्ज वाचला. वादींच्या विद्वान वकीलांना ऐकले. रोजनाम्याचे व अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले.

३) वादींच्या प्रस्तुत अर्जातील कथनानुसार प्रतिवादी क्र. २ब(ब), २ब(क) व २ब(ई) यांना दाव्याचे समन्स काढले असता सदर समन्स न बजावता परत आले आहेत. तसेच सदर प्रतिवादींना आर. पी. ए. डी. ने समन्स काढले असता अपुरे पत्ते असल्या कारणाने ते न बजावता परत आले आहेत. प्रतिवादी क्र. २ब(ब), २ब(क) व २ब(ई) ह्या प्रतिवादी क्र. २ब(ड) अंकुश यशवंत कुंभार यांच्या बहिणी आहेत. प्रतिवादी क्र. २ब(ड) या कामी हजर झाला आहे. सदर प्रतिवादी क्र. २ब(ड) यांनी प्रतिवादी क्र. २ब(ब), २ब(क) व २ब(ई) त्यांचे अपुरे पत्ते दिले आहेत व त्यामुळे सदर प्रतिवादींवर समन्सची बजावणी होत नाही.

४) रोजनाम्याचे व अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन करता असे दिसुन येते की, प्रतिवादी क्र. २ब यशवंत खाशाबा कुंभार हे मयत झाल्यानंतर त्यांचे वारस प्रतिवादी क्र. २ब(अ), २ब(ब), २ब(क), २ब(ड) व २ब(ई) यांची नावे अभिलेखावर घेण्यात आली आहेत व त्यांचे दावा बेलीफांमार्फत समन्स बजावणीकरीता पाठविले असता प्रतिवादी क्र. २ब(ड) अंकुश यशवंत

कुंभार यांच्यावर दाव्याच्या समन्सची बजावणी झाली आहे. निशाणी क्र. ३१२ ते ३१५ खालील बेलीफ रिपोर्टनुसार प्रतिवादी क्र. २ब(ब) वैशाली यशवंत कुंभार, प्रतिवादी क्र. २ब(क) पद्मिनी यशवंत कुंभार व प्रतिवादी क्र. २ब(ई) रेखा यशवंत कुंभार यांचा तपास केला असता त्यांची भावजई व चुलते भेटले व भावजई व चुलते यांनी सदर प्रतिवादींचे समन्स घेण्यास नकार दिला व त्यानंतर गावात हजर लोकांकडे चौकशी केली असता सदर प्रतिवादी ह्या लग्नानंतर त्यांच्या नांदत्या घरी राहत असल्याची तोंडी माहिती मिळाली व त्यामुळे त्यांच्यावर समन्सची बजावणी झाली नाही. त्यानंतर वादींतर्फे निशाणी क्र. ३२१ कडे दाखल केलेल्या अर्जावरील आदेशानुसार प्रतिवादी क्र. २ब(ब) वैशाली यशवंत कुंभार यांचे दावा समन्स बेलीफांमार्फत बजावणीकरीता इचलकरंजी, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर येथे व प्रतिवादी क्र. २ब(क) पद्मिनी यशवंत कुंभार यांचे दावा समन्स बेलीफांमार्फत बजावणीकरीता मलकापूर, कराड, ता. कराड येथे व प्रतिवादी क्र. २ब(ई) रेखा यशवंत कुंभार यांचे दावा समन्स बेलीफांमार्फत बजावणीकरीता वाई, ता. वाई, जि. सातारा येथे पाठविले असता प्रतिवादी क्र. २ब(क) पद्मिनी यशवंत कुंभार व प्रतिवादी क्र. २ब(ई) रेखा यशवंत कुंभार यांचे दावा समन्स बेलीफ रिपोर्टसह न बजावता परत आले आहेत. निशाणी क्र. २२३ व निशाणी क्र. ३२४ खालील बेलीफ रिपोर्टनुसार प्रतिवादी क्र. २ब(क) पद्मिनी यशवंत कुंभार व प्रतिवादी क्र. २ब(ई) रेखा यशवंत कुंभार यांचा तपास केला असता सदर नावाची व्यक्ती मिळून येत नाही व सदर प्रतिवादींचा पत्ता अपुरा असल्याने समन्सची बजावणी झाली नाही. चार तारखा उलटून जाऊनही प्रतिवादी क्र. २ब(ब) वैशाली यशवंत कुंभार यांच्या दावा समन्सचा रिपोर्ट या न्यायालयास प्राप्त झालेला नाही. यावरुन असे दिसून येते की, प्रतिवादी क्र. २ब(ब), २ब(क) व २ब(ई) यांच्यावर नेहमीच्या पद्धतीने दाव्याच्या समन्सची बजावणी होत नाही.

५) प्रतिवादी क्र. २ब(ब), २ब(क) व २ब(ई) ह्या प्रतिवादी क्र. २ब(ड) अंकुश यशवंत कुंभार यांच्या बहिणी आहेत. प्रतिवादी क्र. २ब(ड) या कामी हजर झाला आहे. वास्तविक पाहता प्रतिवादी क्र. २ब(ब), २ब(क) व २ब(ई) यांचे दावा समन्स बजावणीकरीता दाव्यातील नमूद पत्त्यावर पाठविले त्यावेळी सदर प्रतिवादींचे विवाह होऊन त्या सासरी गेल्या असतील तर त्यांच्या माहेरच्या घरातील इतर सदस्यांनी सदर प्रतिवादींचे लग्नानंतरचे नाव व पुर्ण पत्ता बेलीफांकडे देणे आवश्यक होते. याउलट वर नमूद केल्याप्रमाणे निशाणी क्र. ३१२ ते ३१५ खालील बेलीफ रिपोर्टनुसार प्रतिवादी क्र. २ब(ब) वैशाली यशवंत कुंभार, प्रतिवादी क्र. २ब(क) पद्मिनी यशवंत कुंभार व प्रतिवादी क्र. २ब(ई) रेखा यशवंत कुंभार यांचा तपास केला असता त्यांची भावजई व चुलते भेटले व भावजई व चुलते यांनी सदर प्रतिवादींचे समन्स घेण्यास नकार दिला. त्यामुळे वरील नमूद कारणांमुळे माझ्या मते वादींनी या अर्जामध्ये प्रतिवादी क्र. २ब(ब) वैशाली यशवंत कुंभार, प्रतिवादी क्र. २ब(क) पद्मिनी यशवंत कुंभार व प्रतिवादी क्र. २ब(ई) रेखा यशवंत कुंभार यांचे दावा समन्स वादपत्राच्या टायटल क्लॉजमध्ये नमूद केलेल्या पत्त्यावरील घरावर डकवून सदर प्रतिवादींवर दाव्याच्या समन्सची बजावणी होण्याबाबत केलेली विनंती समर्थनीय आहे. त्यामुळे वरील नमूद कारणांमुळे माझ्या मते प्रस्तूतचा अर्ज न्यायाच्या दृष्टीने मंजूर होण्यास पात्र आहे. सबब, हे न्यायालय न्यायाच्या दृष्टीने खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे.

## आ दे श

१) प्रस्तुतचा अर्ज खालीलप्रमाणे मंजुर करण्यात येतो.

२) प्रतिवादी क्र. २ब(ब) वैशाली यशवंत कुंभार, प्रतिवादी क्र. २ब(क) पद्मिनी यशवंत कुंभार व प्रतिवादी क्र. २ब(ई) रेखा यशवंत कुंभार यांचे दावा समन्स वादपत्राच्या टायटल क्लॉजमध्ये नमूद केलेल्या

पत्त्यावरील राहत्या घराच्या दर्शनी भागावर ठळक ठिकाणी चिकटवून सदर प्रतिवादींवर समन्सची बजावणी करण्यात यावी.

Digitally signed by PANDURANG LIMBAJI GHULE
Date: 2025.12.19 17:50:28 +0530

दिनांकः– १९/१२/२०२५ २रे सह दि. न्या. व. स्तर, कराड.